# प्रेमानंद गज्वी यांचे 'तनमाजोरी'

**डॉ. पवन मांडवकर**
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
भ्रमणध्वनी 9422867658
E mail: marathipradhyapak@gmail.com

दलित रंगभूमीचा उदय तमाशा, दंडार, वग या लोकनाट्यांतून झाला आहे. त्यामुळे ही रंगभूमी पारंपारिक जाणिवेतून जरी विकसित झाली तरी कालांतराने परंपरा नाकारत तिने स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. दलित नाट्याचा आशय हा सहसा विद्रोहातून फुलतो आणि संवादही विद्रोही स्वरूपाचे असतात. दलित समाजाची प्रमुख निकड सामाजिक समानता, स्वतंत्रता, बंधुत्व याची प्राप्ती ही आहे. दलित रंगभूमी या समस्यांतून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येते. दलित नाट्यसृष्टीतील समस्याप्रधान नाटकांमध्ये प्रामुख्याने 'नवी वाट', 'नरबळी', 'सूर्यास्त', 'माणुसकीचे बंड', 'पिंजऱ्यातील पोपट', 'वाटा आडवाटा', 'तनमाजोरी' अशा काही नाटकांचा समावेश होतो.

'तनमाजोरी'चे नाटककार प्रेमानंद गज्वी यांनी स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडात आणि त्यानंतरचा काही काळ दलितांचा जो अनन्वित छळ तत्कालीन सत्ताधाऱ्यांकडून, पाटलांकडून किंवा सावकारांकडून केला जात होता, त्याचे प्रत्यक्षदर्शी चित्रण 'तनमाजोरी'त अतिशय मार्मिकपणे केले आहे. मालक आणि शेतमजुरांच्या दरम्यानचा संघर्ष यात चित्रित झाला आहे.

हे नाटक अंकांमध्ये न विभागता नऊ प्रवेशांमध्ये विभागले आहे. काही प्रवेश अगदीच छोटे आहेत; तर काही मोठे. त्यातही मध्ये-मध्ये दृष्यबदल घातले आहेत. एकंदरीत नाट्यलेखनाच्या परंपरागत पद्धतीमध्ये लेखकाने परिवर्तन घडवून आणले आहे.

अत्यंत हीन-दीन, दरिद्री अवस्थेत काळ्या गोट्यावर वस्ती करून राहिलेला दलित समुदाय - त्यात गण्या, सिताबा, राम्या, देव्या ही जरा वयस्कर मंडळी, देव्याची बायको धुरपता, गण्याची बायको सारजा, गण्याचा मुलगा वाशा, राम्याचा मुलगा मन्या आणि इंगळे मास्तर अशी पात्रे रंगवलेली आहेत. खायला पोटभर अन्न नाही, अंगावर धड चिरगुट नाही, तरीही मालकाच्या आज्ञेप्रमाणे सतत त्याच्या शेतावर, धरणावर अपार कष्ट करून कसंतरी पोट जाळणारी ही माणसं - माणसं म्हणण्यापेक्षा मालकाने केलेल्या त्यांच्या दयनीय अवस्थेमुळे जनावर म्हणणंच योग्य.

या नाटकाचा खलनायक 'मालक' - अत्यंत माजलेला, संपत्तीच्या गुर्मीने दलितांवर पदोपदी अन्याय करणारा, इतरांचा छळ करून आनंद मानणे अशा वृत्तीचा आणि यातच स्वतःचे मोठेपण समजणारा, दुष्ट प्रवृत्तीचा असा हा खलनायक प्रेमानंद गज्वींनी इतका सार्थ सजवला आहे की, वाचकांच्या वा प्रेक्षकांच्या मनात पहिल्या प्रवेशापासूनच त्याच्याबद्दल चीड निर्माण होते.

मालकाची सतत भुंकी झेलणारा मुकादम हा मालकाच्या प्रत्येक वाक्याला 'व्हय मालक' म्हणून मान डोलावतो व मालकाला खुष ठेवण्याकरिता त्याच्या आज्ञेनुसार दलितांना मारणे, शिव्या घालणे, लाथेने तुडवणे, अश्लील बोलणे अशी कृत्ये करतो. वास्तविक मालक त्यालाही तुच्छतेनेच वागवतो, पण मुकादम मालकाच्या आज्ञेतच जगण्यात समाधान मानतो आणि दलितांची दुःखे कळत असूनही दुष्ट वर्तन करतो.

'राम्या हे पात्रही मालकाच्या विरोधात बोलत नाही; कारण आपण मालकाच्या विरोधात गेलो तर सित्याबा, देव्या, गण्या, वाशा यांची जी गत झाली तीच आपलीही होईल, ही भीती त्याच्या मनात असते. मालकाची मर्जी राखून आपल्याच माणसांवर अन्याय करतो व आपल्या 'मन्या' नावाच्या मुलाला नोकरी मिळावी म्हणून मालकाची 'हांजी हांजी' करतो.

दलितांच्या वस्तीमधील मुलं शाळेत शिकतात, हे मालकाला पसंत नसतं. कोणत्याही दलिताने मालकाला 'पायलागी' म्हटलंच पाहिजे. आणि तेही पूर्ण ओणवे होऊन - जमिनीला हात लावून. इंगळे मास्तर शर्ट-पायजमा घालून दोन हात जोडून मालकाला 'नमस्कार' करतात तर त्यांना मुकादमाकडून नम्र 'पायलाजी' शिकवली जाते. मालकाची भाषा सतत उर्मटपणाची, दुसऱ्याला हिडिस-फिडिस करणारी आहे. शुद्ध मराठी बोलणाऱ्या इंगळे मास्तरांना मालक जबरदस्तीने ग्रामीण भाषा बोलायला लावतो. 'नाहीतर सित्यासारखा लंगडा करील, देव्यासारखा पाठीवर आसूड ओढील, डोळे वर करून पाहशील तर पापणीचे केस उपटून टाकील' अशी भीती त्याला घालतो. सर्व दलित भेदरलेले आहेत आणि 'जी मालक' म्हणणारे आहेत. कारण वेळप्रसंगी त्यांना बंदुकीचीही भीती घातली जाते.

वाशासारखा चौथीत शिकणारा पोर मालकाने पायाखाली दाबलेली विटी मालकाचा पाय उचलून काढून घेतो. तो अपमान समजून मालक त्याला चाबकाने फोडून काढायचे ठरवतो. वाश्याचा बाप मालकाच्या कामावर राबतच असतो. वाश्याची आई सारजा बरे नसतानाही मुकादमाचे घाणेरडे शब्द ऐकून काम करते. काम करताना तिचा अंत होतो. तिच्या मयतीसाठी मालकाकडून गण्या पन्नास रुपये घेतो, तर त्या बदल्यात गण्याच्या मुलाला-वाश्याला मालकाकडे गहाण ठेवावे लागते. ही अत्यंत क्रूर अशी प्रथा दलितांना वंशपरंपरेने पिळून काढण्यासाठी मालकाने सुरू ठेवलेली असते. असा पाषाणहृदयी मालक आणि मेंढरासारखी मुकाट्यानं अन्याय सहन करणारी, राबणारी दलित माणसं पाहून कुणाच्याही हृदयाला पाझर फुटावा, अशी दृष्ये या नाटकात ठायीठायी आढळतात.

तरुण दलित बायकांवर मालकाची वाकडी नजर असते. या स्त्रियांना उपभोगणे हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, अशा अरेराव भाषेत तो हुकूम सोडतो आणि त्याला मुकादम व राम्या गडी साथ देतात. देव्याची बायको धुरपता मालकाने जबरदस्तीने वाडीत नेऊन ठेवलेली असते. तिला नटावयास भाग पाडून तो आपली तृप्ती करून घेतो. देव्याच्या समोरही तिच्याशी तो आषुकमाषुक वागतो. हतबल देव्याला मालकाने दारू पाजून व्यसनाधीन ठेवले असते. त्यातच तो वेड्यासारखा बडबडत राहतो. 'लई तन माजलंय, काढाया पाह्यजे' हे त्याचं पालूपद सतत त्याच्या तोंडी असतं. तो कुणालाही 'एक बिडी द्या' म्हणून मागत असतो. एका पायाने लंगडा सित्या, वाश्याला अत्यंत दुःखी अंतःकरणाने मालकाच्या स्वाधीन करणारा गण्या, आपल्या मुलाला - मन्याला नोकरी मिळावी म्हणून आपल्याच जातीच्या लोकांवर मालकाच्या हुकुमाने अत्याचार करणारा राम्या आणि गोरगरिबांचा होत असलेला कोंडमारा, छळ पटत नसूनही मालकाची आज्ञा स्वतःच्या स्वार्थासाठी पाळणारा मुकादम या सगळ्या व्यक्तिचित्रणांतून दलितांच्या अज्ञानामुळे व दारिद्र्यामुळे होणाऱ्या शोषणाचे प्रत्ययकारी दर्शन या नाटकातून घडते.

नऊ प्रवेशांच्या या नाटकात चौथ्या प्रवेशात इंगळे मास्तर अवतरतात. मालकाच्या अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध सगळी दलित वस्ती जागृत करण्याचे ते ठरवतात. युक्तीने दलितांची हिंमत वाढवून ते मालकाविरुद्ध त्यांना भडकवतात. पुढे मास्तरांच्या बायकोलाही वाडयावर बोलवण्यास मालक कचरत नाही. वरवर मालकाची खुशामत करून मास्तर नाटक करतात. सित्याबाच्या अंगात देवी आल्याचे ढोंग केले जाते. वाश्याला पळून जाण्यास सांगून मालकावर सूड उगवण्यासाठी हाती हंटर घेण्यास त्याला भाग पाडतात. शिक्षणामुळेच इंगळे मास्तर अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी दलितांना जागृत करू शकतात, हेही गज्वींना पटवून द्यायचे

आहे. शेवटी सगळे दलित एकत्र येऊन मालकाने केलेल्या अत्याचारांचा बदला घेतात व त्याच्याच चाबकाने त्याला फोडून काढतात, शेण खाऊ घालतात आणि नाटक संपते.

प्राथमिक शाळेला शिकविण्यासाठी नेमलेला दलित समाजातलाच एक शिक्षित तरुण - इंगळे मास्तर. इंगळे मास्तर हे नाटकाचे खरे नायक आहेत असे म्हटले तरी वावगे होणार नाही. इंगळे मास्तरांना हिसका दाखवण्याचा मालक वारंवार प्रयत्न करतो. त्यांचे शर्टपॅंट घालून येणे, हात जोडून नमस्कार करणे, शुद्ध भाषेत बोलणे मालकाला खपत नाही. आपल्यासमोर सगळी माणसं तुच्छ, हीन मानून तो मास्तरांना 'धोतर, बंडी नेसा, ग्रामीण भाषेत बोला, नमस्कार न करता अगदी लवून पायलागी करा' हे मुकादमाकडून शिकवतो. गावचा सर्वेसर्वा मालक, तेव्हा त्याचं म्हणणं मानणं भाग आहे, कारण गुरुजींना नोकरी करायची आहे, म्हणून ते मालकाच्या सांगण्याप्रमाणे सुरुवातीला वागतात; पण आतून त्यांचा तडफडाट चाललेला असतो. वाशाच्या उदाहरणावरून मालक लहान मुलांवरही अत्याचार करतो, हे गुरुजी पाहतात आणि त्याबद्दल थोडी रदबदली करण्याचा प्रयत्न करतात; पण त्यावर आधीच्या मास्तरांचे आपण कसे हाल केले, त्याचे वर्णन मालक ऐकवतो. उलट्या काळजाचा मालक कुणाच्याही जीवावर उठायला मागेपुढे पाहणार नाही हे मास्तर जाणून असतात. सित्या, गण्याही त्यांना समजावून सांगतात की मालकाला विरोध करणं ही अशक्य बाब आहे.

इंगळे अस्पृश्य म्हणून मालक तुच्छतेचे उद्गार काढतो. 'धोतर-बंडी नसेल तर लंगोट नेसून ये पण शर्टपॅंट घालून वरचढ होऊ नकोस' असे तो म्हणतो. इंगळे मास्तर मालकाच्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध सगळी दलित वस्ती जागृत करण्याचे ठरवितात. उघड-उघड मालकाचा विरोध करण्याऐवजी हळूहळू ते सित्याबा, देव्या, गण्या यांना अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्यांनी तयार करतात. सित्याबाच्या अंगात देवीचा संचार आणण्याचे ढोंगही ते रचतात. त्यातून मुकादम आणि राम्याही मालकाला सौम्यपणे विरोध करू लागतात.

'रानाईचा कोप झालाय. सित्याबा भगत आहे. त्याच्या अंगात संचार झाला की 'आपली धडगत नाही.' या भीतीनेही मुकादम मालकाला आवरण्याचा प्रयत्न करतो. या सगळ्या बदलामागे इंगळे मास्तरांचं डोकं असतं. मालकापुढे मान वर करून पाहण्याची किंवा एक शब्द उच्चारण्याची प्राज्ञा नसलेली ही दलित वस्तीतील माणसं उघडपणे नाही तरी गुप्तपणे मालकाच्या विरोधातील कटात सामील होतात. मालकाच्या तावडीतून सुटून गेलेला वाशाही इंगळेंच्याच प्रेरणेने, शिकवणुकीने हातात हंटर घेऊन मालकाच्या पाठीवर ओढण्याइतका बेफाम होतो. ही हिंमत साऱ्या दलित वस्तीला इंगळे मास्तरच देतात. देव्याच्या पत्नीची - धुरपताची झालेली दुर्दशा, गण्याची पत्नी सारजा - हिच्यावर असणारा मालकाचा डोळा, आणि अखेर इंगळे मास्तरांच्या बायकोलाही आपली बटीक करण्याची मालकाची वासना या सगळ्या कारणांनी मास्तर आतून पेटून उठतात. दलितांच्या मृत मनाला ते जिवंत करून पेटून उठण्यास भाग पाडतात आणि अखेर सर्वांना एकत्र आणून अन्यायी-निर्दयी मालकाला त्याच्याच चाबकाने फोडून काढतात आणि त्याची जागा दाखवून देतात.

मास्तरांचं गज्वींनी केलेलं चित्रण खरोखरच हृदयस्पर्शी आहे. शिक्षणामुळेच इंगळे मास्तर अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी दलितांना जागृत करू शकतात, हो गज्वींना पटवून द्यायचं आहे.

'माजं घर, तुजं घर
सारा अंधार अंधार
बुजवील कोन, कसं
आभाळाचं हये खिंडार'

या गाण्यातून दरिद्री, अज्ञानी, कष्टकरी दलित जनतेचे यथार्थ चित्रण गज्वींनी केले आहे. या प्रमाणेच अधूनमधून

'देवी रानाई, घालितो गाऱ्हानं

तुज्या सेवंला, अर्पिन परान'

या गाण्याचे घुमणारे सूर दलितांच्या अंधश्रद्धेचे, अडाणीपणाचे दर्शन घडवितात.

श्रीमंत दलितेतरांनी दलितांच्या स्त्रियांवर मनमानी बलात्कार करणे, आर्थिक मदत करण्याचा आव आणून दलितांना असह्य त्रास देणे, वेठबिगार म्हणून वंशपरंपरेने राबवणे, क्षुल्लक कारणासाठी चाबकाने फोडून काढणे, पाय तोडणे, डोळे फोडणे, बायका पळवणे असले सगळे अन्याय पोटाची खळगी भरण्यासाठी व अडाणीपणामुळे दलित सोसतच राहतात, असे हे शोषणाचे चित्रण सहृदयाच्या डोळ्यांत अश्रू उभे करते.

दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार, स्त्रियांवर बलात्कार, जुलूम, जबरदस्ती, अनन्वित छळ, धाकदपटशा, आणि दरिद्री लोकांचे आर्थिक व शारीरिक शोषण याचा अत्यंत मार्मिक आलेख 'तनमाजोरी' या नाटकातून दिग्दर्शित झाला आहे. संपूर्ण नाटकाच्या वाचनानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की अज्ञानामुळे, अशिक्षितपणामुळे आणि पराकोटीच्या दारिद्र्यामुळे दलित स्त्री-पुरुष परिस्थितीशरण होतात. पोटाची वीतभर खळगी भरण्यासाठी कोणत्याही असह्य परिस्थितीतही तोंड न उघडता अत्याचार सहन करतात आणि आपल्या पुढच्या पिढीलाही तशीच शिकवण देतात.

नाटकाची अखेर सकारात्मक करून शिक्षणामुळेच अन्यायाचा प्रतिकार करता येतो, हो गज्वींना 'तनमाजोरी'तून पटवून द्यायचे आहे.

❖❖❖